# <u>प्रेस नोट</u>

## परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील अलंकार पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय परिक्षेत्रातून हद्दपार केलेबाबत

दिनांक १७/०५/२०१९

अलंकार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे संजय शंकर गोखले वय-३२ वर्षे, रा. हॅपी कॉलनी लेन नं. ३ गोसावी वस्ती, कोथरूड, पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक २०/२०१९ दिनांक १७/०५/२०१९ रोजी सहा महिन्या करीता पुणे शहर पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यत्रातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह स्वतः जवळ घातक शस्त्र बाळगणे,खुनाचा प्रयत्न,दरोडा तसेच जबरी चोरी वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द अलंकार,वारजे तसेच कोथरूड पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातून सहा (०६) महिन्या करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.